# दूरशिक्षणातून मूल्य रुजवितांना समंत्रकांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास

[१] डॉ.कविता साळुंके, [२] कु.ज्योती आर. लष्करी
[१] संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक
[२] पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक

## सारांश

सद्यस्थितीचा जर अभ्यास केला तर मानवी जीवन हे एखाद्या यंत्रासारखे झाले आहे अगदी भावना शून्य. स्वत:ची प्रगती करीत असतांना किंवा स्वत:च्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाच्या हातून कोणत्या आयोग्य कृती होतील हे सांगणे अवघडच. वाढती जीवघेणी स्पर्धा, एखाद्याला पुढे नजावू देण्याची वृत्ती पाल्य आणि पालक यांच्यातील वाढत चालेला दुरावा, शिक्षक विद्यार्थी संबंध, समाजात वाढत चालेली आरजकता, वाढते वैमनस्य, ढासळत चालेली नीतिमत्ता ही समाजातून राष्ट्रातून माणुसकीचे ऱ्हास करण्यास करणीभूत ठरू शकते. यामुळे आज मूल्यशिक्षण देणे ही काळाची गरज झालेली आहे असे वाटते. मूल्यशिक्षण देणे ही जबाबदारी प्रामुख्याने कुटुंबाची असली तरी आज तशी पूर्वीसारखी कुटुंब व्यवस्था भारतात राहिलेली नाही, या कुटुंब व्यवस्थेचे चित्र आपणास माहित आहे.

यामुळे मूल्यशिक्षण देण्यासाठी शाळा व शिक्षका शिवाय पर्याय नाहीच. म्हणूनच आज भारतात आणि महाराष्ट्र राज्यात प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणात पारंपरिक विद्यापिठातून मूल्यशिक्षण कमी जास्त प्रमाणत दिले जाते. काळाची गरज लक्षात घेता दूरशिक्षणातून देखील मूल्यशिक्षण देण्याचा प्रयत्न होतांना दिसतो. समंत्रकांना दूरशिक्षणातून मूल्य रुजवितांना काही अडचणी जाणवतात का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला. या पेपरमध्ये दूरशिक्षणातून मूल्य रुजवितांना समंत्रकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला आहे.या संशोधन लेखात दूरशिक्षणाची संकल्पना, मुक्त विद्यापीठाची संकल्पना, मूल्यशिक्षणाची संकल्पना, गरज, विविध स्तरावरील प्रयत्न, आणि मूल्यशिक्षण रुजवितांना येणारे प्रश्न व आव्हाने याची सविस्तर माहिती दिली आहे. मूल्य रुजवितांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच मुक्त विद्यापीठातील नाशिक विभागातील एकूण पाच अभ्यासकेंद्र आणि तेथे समंत्रणाचे कार्य करणारे एकूण ३५ समंत्रक यांची सहेतुक पद्धतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली आणि टक्केवारीच्या वापर करून निष्कर्ष काढण्यात आले आहे, सदर निष्कर्ष पेपरमध्ये देण्यात आले आहे.

**बीजसंज्ञा:** दूरशिक्षणातून मूल्यशिक्षण

**प्रस्तावना**

भारताची लोकसंख्या ही जगाचा पाठीवर दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाकाय लोकसंख्या असलेल्या या देशात शिक्षणाचा विविध संधी उपलब्ध आहेत. त्यापैकी दूरशिक्षण हे महत्वपूर्ण संधी आहे. या दूरशिक्षणात व्यक्तीला आहे त्या ठिकाणाहून आपल्याला हवे असलेले शिक्षण घेता येवू शकते अथवा पूर्ण करता येवू शकते व्यक्ती जर शाळेत जावून शिक्षण येवू शकत नसेल तर घरी बसून किंवा नोकरी करीत असतांना हे शिक्षणपूर्ण करून शकल्यामुळे दूर शिक्षण हे ही त्यांना संजीवनी ठरू शकते या हेतूने दूर शिक्षणांची संकल्पना उदयास आली आहे.



Scanned with CamScanner

**दूरशिक्षणाची संकल्पना**

विद्यार्थी व शिक्षक हे दोन्ही एकमेकांपासून अंतर व परिसराच्या दृष्टीने दूर असतात. अशा वेळी या दोन्ही ध्रुवांना जोडणाऱ्या विशिष्ट दृश्याची गरज असते. आणि सेतू म्हणजेच दूरशिक्षण होय. दूरशिक्षण पध्दतीत सुध्दा अध्ययन अध्यापन प्रक्रिया होते. परंतु या पध्दतीत शिक्षक व विद्यार्थी यात अंतर असल्याने अंतर क्रिया लगेच न होता काही काळानंतर घडून येते. तंत्रज्ञानाचा प्रगतीमुळे दूरशिक्षणाची सुविधा आज सहज शक्य झाली आहे आणि पुढे होत राहील.

दूरशिक्षण ही संकल्पना १५० वर्ष जुनी आहे. १८५० मध्ये प्रथम पत्राचार शाळेची जर्मनी येथे स्थापन झाली. त्यानंतर १८९१ मध्ये थॉमस ने फॉस्टारयांनी पेनसिल्वेनिया येथे आंतरराष्ट्रीय पत्राचार शाळा स्थापना करून त्यासाठी निर्देशन साहित्य तयारकेले. असे प्रयत्न सर्व राष्ट्रात वारंवार होऊ लागले साधारणतः १९४७ पर्यंत अनेक राष्ट्रात पत्राचाराव्दारे शिक्षण देण्यास प्रारंभ झाला.

भारतातील पत्राव्दारे पाठ्यक्रम व शिक्षणाचा प्रारंभ १९६०-६२ च्या दरम्यान झाला. कोठारी समितीच्या सूचनेनुसार १९६२ मध्ये दिल्ली विद्यापीठाने पत्राव्दारे शिक्षण हा प्रकल्प सुरु केला त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याने इतर अनेक विद्यापीठांनी दुरस्थ शिक्षणाचे पाठ्यक्रम सुरु केले. आज संपूर्ण भारतात पत्राव्दारे शिक्षणक्रम जवळजवळ बंद झाले असून त्याची जागा दुरस्थ शिक्षणाने घेतली आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतात मुक्त विद्यापीठ स्थापन झाली आहेत आणि इतर विद्यापीठेही दुरस्थ शिक्षणाचे शिक्षणक्रम राबवित आहेत.

भारतात प्रामुख्याने दूरशिक्षण देण्याचे कार्य आंध्रप्रदेश येथील आंबेडकर मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद १९८२ इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, दिल्ली (१९८६), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (१९८९) यासारखी अनेक विद्यापीठे कार्यकरीत आहेत. याशिवाय अनेक पारंपारिक शिक्षण देणारे विद्यापीठही दुरस्थ शिक्षणांच्या औपचारिक क्षेत्रात संपर्क व इतर माध्यमाव्दारे कार्य पार पाडतांना दिसतात. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातून मुक्त शिक्षण दिले जात आहे. IGNOU, CIET, SCERT व्दारे इ. ५ ते ११ वयोगटातील शाळेतील व शाळेबाहेरील मुलांसाठी दुरस्थ शिक्षणाचे कार्यक्रम दूरदर्शनवर दाखवले जातात. बाळचित्रवाणी सारख्या कार्यक्रम दूरदर्शन व रेडीओ मार्फत विद्यार्थ्यांना दाखविला जातो. सद्यस्थित एड्यूसेट नावाचा ग्रह हा विशेष करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्य करीत आहे. NCERT, SCERT, UGC या मार्फत देखील कार्यक्रमांची योजना असून कार्यवाहीत आणतांना दिसते.

**व्याख्या**

"दूरशिक्षण म्हणजे शिक्षण संस्थेकडून स्वतंत्र वर्गात विद्यार्थी व शिक्षक यांच्या समोरासमोरील उपस्थिती शिवाय नियोजन मार्गदर्शन व अध्यापन या सुविधाचा लाभ घेऊ शकणारे विविध पातळ्यावरील विविध प्रकारचे अभ्यास होय".

"दुरस्थ शिक्षणात कदाचित औपचारिक पध्दतीतील मार्गदर्शक व आंतरक्रिया शक्य होत नसल्या तरी विद्यार्थ्यांच्या थेट घरापर्यत पोहोचून शिक्षण देणारे एक महत्वाचे माध्यम आहे अशा या दुरस्थ शिक्षणामध्ये शिक्षण दूरदर्शनव्दारे शिक्षण ई-शिक्षण आणि इतर छापली ध्वनी मुद्रित चलचित्र मुद्रित यादी तंत्रविज्ञानात्मक साधनांचा वापर दुरस्थ शिक्षण प्रक्रियेत केला जातो."



Scanned with CamScanner

### दुरस्थ शिक्षणाची गरज व महत्त्व

१. शिक्षणापासून वंचित असणारे विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रवाहात आणण्यासाठी
२. प्रज्ञावंताचा शोध घेऊन जागृती व विकास करण्यासाठी
३. अगदी कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांना शिक्षण देण्यासाठी
४. औपचारिक शिक्षणातून विविध कारणामुळे बाहेर पडणाऱ्या वैविध्यपूर्ण स्तरावरील व्यक्ती गटासाठी गरजेचे आहे.
५. अभ्यासू व तज्ञ् शिक्षक-मार्गदर्शकाची उणीव दूर करता येते
६. अध्ययनार्थी व अध्यापक यातील अंतर अधिक असतांनाही दुरस्थ शिक्षण देता येते
७. सर्वांसाठी शिक्षण संकल्पना व उद्दिष्ट खऱ्या अर्थाने सार्थ व पूर्ण करण्यासाठी दूर शिक्षणाची गरज व महत्व आहे.

### दुरस्थ शिक्षणाची उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडसर दूर करणे
२. स्वाध्याय गृहपाठ प्रात्यक्षिक कार्ये याव्दारे अध्ययनार्थीस योग्य असे प्रत्याभरण देणे.
३. संपर्क माध्यमाव्दारे अध्ययनार्थींच्या गरजा पूर्ण करणे

### दूरशिक्षणाचे विविधप्रवाह

१) मुक्त शिक्षण- मुक्त विद्यालये, विद्यापीठे २) पत्राव्दारे शिक्षण३) निरंतर शिक्षण

### दुरस्थ शिक्षणातील विविध साधने व माध्यमे

पठण व वाचन साहित्य, लिखित साहित्य-पुस्तके, कार्यपुस्तिका मार्गदर्शिका इ., रेडीओ व दूरदर्शन ध्वनिफिती, चित्रफिती व चित्र ध्वनिफिती, आभासी वर्ग टेलीकॉन्फरन्सिंग ई-मेल, संगणक, मोबाईल, यादी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान साधने (जाधव रवी, गायकवाड)

### मुल्यशिक्षण

मूल्यशिक्षणाला इंग्रजीत Value Education असे म्हटले जाते. मूल्यशिक्षणाच्या व्याख्या केलेल्या आढळत नाहीत पण मूल्यांच्या व्याख्यांच्या आधारे मूल्यशिक्षणाच्या व्याख्या करता येतात.

**हेन्रीज्युल्स-** "मूल्यांच्या व्याखेच्या आधारे असे म्हणता येते की, ज्या बाबीला आपण चागले समजतो, त्या बाबीचे शिक्षण मूल्य शिक्षण"

**ऑलपोर्ट-** "ह्यांनी केलेल्या मूल्यांच्या व्याख्येच्या आधारे असे म्हणता येते की, व्यक्तीमत्वाला प्रभावी करणाऱ्या घटकांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण."

**मूल्यांचे अध्यापन-** मूल्यांचे अध्यापन या संदर्भात 'सद्गुण शिकवता येत नाहीत' हे सॉक्रेटीस या तत्वचिंतकाचे म्हणणेप्रमाण मानले जाते. या मताप्रमाणे मूल्यशिक्षण हा इतर शालेय विषयाप्रमाणे स्वतंत्र विषय होवू शकत नाही. मूल्य शिकविता येत नाहीत. ती आत्मसात कशी करायची याचे मार्गदर्शन करणे मात्र क्रमप्राप्त ठरते. मूल्यांचे अध्ययन करणे म्हणजे चांगले काय आहे ह्याचे ज्ञान देणे होय.



Scanned with CamScanner

उदा. आई आपल्या मुलाला सांगते 'नेहमी खरे बोलावे' पण प्रसंग असा येतो कि आईच खोटे बोलते.तो प्रसंग असा-दारावरून गाय जाते. तिचा पाठलाग करणारा कसाई आईला विचारतो 'गाय इकडे आली का? त्यावर आई सांगते, गाय इकडे आलीच नाही. मग मुलगा आईला विचारतो, आई तू खोटे का बोललीस? त्यावर सांगते 'गाय इकडे आली हे जर कसायाला सांगितले असते तर त्याने गाईला पकडले असते. तिला नेऊन मारले असते.प्राण वाचविण्यासाठी खोटे बोलणे आवश्यक होते. वरील उदाहरणावरून स्पष्ट होते कि, योग्य प्रसंगाच्या माध्यमातून मूल्य संस्कारित करता येतात.

**मूल्य आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध-** मूल्य आणि शिक्षणाचा एकात्म संबध आहे. शिक्षणातून मूल्य वगळले तर माणसाला मांगल्याचे पावित्र्याचे आकर्षण राहणार नाही. त्याची विचार करण्यची क्षमताच हरवून जाईल. पशुपेक्षा वेगळे समजता येणार नाही. आहार, निद्र, भय, मैथुन एवढ्याच त्याच्या जैविक प्रक्रिया शिल्लक राहतील. उदा. माणसाकडे मिसाईल बनविण्याचे ज्ञान आहे. परंतु त्याचा उपयोग मिसाईल चांगल्या किवा वाईट गोष्टीसाठी करायचा हे मूल्यावर / विवेकावर अवलंबून असते.

**मूल्यशिक्षण उद्दिष्ट्ये-** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ह्या संस्थेने प्रसिध्द केलेल्या शिक्षण प्रकल्पाच्या (इ.स.१९८४ -८५ ते १९८६-७८) मूल्यमापन अहवालात (इ.स.१९८७-१९८८) शालेय शिक्षणातील नैतिक शिक्षणाची सामान्य उद्दिष्ट्ये मांडण्यात आलेली आहेत ती पुढीलप्रमाणे.

१. सत्यप्रियता, परस्पर सहकार्य, प्रेम, शांतता व अहिंसा, धैर्य, समता, न्याय, श्रमनिष्ठा, बंधुभाव आणि विज्ञाननिष्ठा हे मुलभूत मानवी सद्‌गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
२. विद्यार्थ्यांमधून जबाबदार नागरिक घडविणे.
३. समाजवाद, सर्वधर्म समभाव आणि लोकशाही या राष्ट्रीय उद्दिष्टांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगणे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रवृत्त करणे.
४. सभोवतालच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीविषयी समज व जाण निर्माण करणे व त्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी उद्युक्त करणे.
५. धर्म, भाषा, जात, लिंग याविषयी अपसमजातून बाहेर पडून विचार व वर्तनात समजूतदारपणा वाढवण्यास प्रेरणा देणे.
६. आत्मज्ञान व आत्मसन्मान जागृत करून विकास करणे.
७. स्व, राजकीय, स्वदेश, इतरदेशातील व्यक्ती, आंतरराष्ट्रीय सामजस्य अन्य जीव व सृष्टी, सर्वधर्म याविषयी अनुकूल अभिवृत्ती निर्माण करणे.
८. मूल्यांच्या संस्कारासाठी मूल्यांना पोषण असे उपक्रम शाळेत राबविणे.
९. आपल्या परिसरात असलेल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक वारश्याची जपणूक करण्याचे महत्त्व विद्यार्थ्याला पटवून देणे.
१०. विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रुजविण्यासाठी विद्यार्थ्यांकडून काही उपक्रम प्रकल्प करवून घेणे.
११. मूल्यांच्या जोपासनेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे.

**मूल्य शिक्षणाचे घटक**

१) संवेदनशीलता २) वक्तशीरपणा ३) नीटनेटकेपणा ४) स्त्री-पुरुष समानता ५) श्रमप्रतिष्ठा
६) वैज्ञानिक दृष्टीकोन ७) सर्वधर्म सहिष्णुता ८) सौजन्यशीलता ९) राष्ट्रभक्ती १०) राष्ट्रीय एकात्मता



Scanned with CamScanner

वरील दूरशिक्षणाची व मुल्यशिक्षणाची संकल्पना पाहिल्यानंतर आपण आता दूरशिक्षणातील मुल्यशिक्षणाची रुजवणूक करतांना सेवा अंतर्गत प्रशिक्षणार्थींना काही अडचण येतात. का? याचा अभ्यास करणार आहोत.

भाग: २

**शिक्षण प्रशिक्षणातून मूल्य रुजवणूकीचे शिक्षण**

शाळेतील मूल्यशिक्षणाची स्वतंत्र तासिकेचा विचार केला असता, उच्चशिक्षणात मुल्यशिक्षणाला महत्व कमी दिल्याचे दिसून येते. NCTE ने तयार कलेल्या फ्रेमवर्कमध्ये मुल्यशिक्षणाला पाहिजे तेवढे भारांश दिलेला नाही. शिक्षण- प्रशिक्षणाचा विचार केला असता यात देखील मुल्यशिक्षणाचा विचार गांभीर्याने केलेला दिसून येत नाही.

शिक्षण प्रशिक्षण हे दोन प्रकारे दिले जाते. १) सेवापूर्व शिक्षण- प्रशिक्षण २) सेवा अंतर्गत शिक्षण प्रशिक्षण. शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्य व सैद्धांतिक भागाची माहिती व्हावी, अध्यापनाचे कौशल्य अवगत व्हावे, याकरिता सेवेत रुजू होण्याआधी जे शिक्षण दिले जाते त्याला सेवापूर्ण शिक्षण- प्रशिक्षण म्हणतात.

**सेवाअंतर्गत शिक्षण प्रशिक्षण**

"सेवेत असतांना जे प्रशिक्षण दिले जाते.त्याला सेवांतर्गत प्रशिक्षण असे म्हणतात" (Hussen T.,1198 INSET)

**उद्दिष्ट**

१. बी.एड.अभ्यासक्रमात समाविष्ठ मूल्यांचा शोध घेणे.
२. बी.एड. संमंत्रकांना दूरशिक्षणातून मूल्यशिक्षणाची रुजवणूक करतांना येणाऱ्या अडचणीचा शोध घेणे.
३. उपाय योजना सुचविणे.

**कार्यवाही**

सदर संशोधनासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी. एड. अभ्यासक्रमात समाविष्ठ मूल्याचा शोध घेण्यासाठी आशय विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे आणि संमंत्रकांना दूरशिक्षणातून मुल्यांची रुजवणूक करतांना येणाऱ्या अडचणीचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा वापर केला आहे. नमुना म्हणून नाशिक विभागातील एकूण पाच अभ्यासकेंद्रातील एकूण ३५ संमंत्रकांची सहेतुक नमुना पध्दतीने निवड करण्यात आली आहे व मिळालेल्या माहितीचे विश्लेषण हे टक्केवारीच्या स्वरुपात मांडण्यात आले आहे.

**गृहीतक**

१. बी.एड.अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा समावेश केला आहे.
२. संमंत्रक छात्रअध्यापकामध्ये मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न करतात.

**निष्कर्ष -उद्दिष्ट क्र. १**

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.एड. अभ्यासक्रमात ७०% मूल्यांचा समावेश आहे.



Scanned with CamScanner

२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.एड. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक भागात ३०% समावेश मूल्यांचा दिसून येतो.
३. बी.एड. अभ्यासक्रमातील एकून अध्यापन पध्दतीमध्ये १०% मूल्यशिक्षणाचा समावेश दिसून येतो.
४. बी.एड. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्यात ३०% समावेश मूल्यशिक्षणाचा दिसून येतो.

**उद्दिष्ट क्र.२**

१. ९०% संमंत्रक तासिका कमी असल्यामुळे छात्र अध्यापकांमध्ये मूल्यांची रुजवणूक करतांना अडचणी येतात.
२. ८०% अतिरिक्त कामाच्या बोजा असल्यामुळे मूल्यांची रुजवणूक करण्यात अडचणी येतात.
३. ९०% संमंत्रक मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण मिळत नाही. समंत्रक काही कारणास्तव दरवर्षी बदलले जातात. म्हणून व्यक्ती परिपूर्णपणे मूल्यशिक्षणासारख्या विषय हा नियमित हातळत नाही म्हणून अडचणी जाणवतात.
४. ३०% संमंत्रकाना मूल्यशिक्षणाचे प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेतील भाषा अवघड वाटते म्हणून ते छात्राध्यापकास समजून सांगण्यास व प्रात्यक्षिक कार्य करतांना अडचणी जाणवतात.
५. ७०% संमंत्रकाच्या मते मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी प्रात्यक्षिक कार्य जास्त असावी आणि प्रात्यक्षिक कार्याचा कालावधी वाढवावा.

**उपाय**

१. मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण हे विद्यापीठ स्तरावर घेतात हे प्रत्येक अभ्यासकेंद्रावर देण्यात यावे.
२. मूल्यशिक्षण हा विषय NCTE ने बी.एड. प्रशिक्षकांना सक्तीचा करावा.
३. NCTE च्या बी.एड. व बी.ए. अभ्यासक्रमात मुल्यशिक्षणाचा प्रत्याशिक्षक कार्याला अधिक महत्व दिला गेला पाहिजे.
४. मूल्यशिक्षणाच्या पाठाची सोय करायला हवी.
५. मूल्य रुजवणूकीचे मूल्यमापन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जावे रुजवणुकीचे प्रशिक्षण संमंत्रक व छात्र अध्यापकांना दोघांनाही दिले जावे.
६. मूल्यशिक्षणाचे छात्र अध्यापकांसाठी एक स्वतंत्र संपर्क सत्र घेण्यात यावे.
७. मूल्यशिक्षणाचा समावेश हा बी.एड. अभ्यासक्रमातील अध्यापन पध्दती बरोबर व इतर सैद्धांतिक विषयात देखिल करावा आणि असा आशय असावा ज्यामधून मूल्यशिक्षणाची रुजवणूक होवू शकते.
८. सर्व विषयात मूल्यशिक्षणाचा समावेश केला तर संमंत्रक हे सांघिक अध्यापन पध्दतीने अथवा समावाय पध्दतीने या मूल्याची रुजवणूक करू शकतील.

**समारोप**

अशा पध्दतीने मूल्यशिक्षणाला जर शालेय स्तरावर रुजवणूकी संदर्भात महत्वपूर्ण आहे तर शिक्षण-प्रशिक्षणात देखील मूल्यशिक्षणाला तेवढेच महत्व दिले पाहिजे मूल्यांची रुजवणूक करणारा शिक्षक जर मुल्यांचा अभ्यास करणारा नसेल तो कसे मूल्यांची शिकवण देत असेल मूल्यशिक्षण हा विषय शक्तीचा नसल्याने शिक्षक-प्रशिक्षणातील ४२ छात्र अध्यापकांपैकी फक्त २० छात्रअध्यापक हा विषय घेता आणि उर्वरित २२ विद्यार्थी दुसऱ्या विषय घेता मात्र शालेय स्तरावर हे छात्राध्यापक सर्व शालेय स्तरावर अध्यापनाचे कार्य करतात म्हणूनच शिक्षक प्रशिक्षणात छात्र अध्यापकांना या मूल्यशिक्षणाची रुजणूक करणे आवश्यक आहे आणि



Scanned with CamScanner

मूल्याची शिकवण कशी द्यावी याचे प्रशिक्षण गरजेचे आहे. मुल्यांची रुजवणूक करणे शाळेतील कुण्या एक शिक्षकाचे काम नाही तर शाळेतील सर्व शिक्षकांचे कर्तव्य आहे आणि यासाठी सतत प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे आणि शिक्षकांचे आचरण ही योग्य असले पाहिजे. म्हणून या अभ्यास नंतर संशोधीकेस असे वाटते शासनाने बी. एड. अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण हा विषय अतिशय सक्तीचा करावा तेव्हाचा शालेय स्तरावर मूल्यांची रुजवणुकांसाठीचे गांभीर्य वाढीस लागेल.

## संदर्भ सूची


१. कुलकर्णी शालिनी,(२००९), मूल्यशिक्षण दृष्टी उपक्रम, सुयोग प्रकाशन
२. मूल्य व जीवन शिक्षण मार्गदर्शन पुस्तिका गट क्र.२ इयत्ता ५ वी ७ वी संपादकीय
३. चित्ते हेमंत, (२०१५), शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा, सात्विक प्रकाशन, नाशिक
४. कुलकर्णी वि. रा., (१९८०), 'शैक्षणिक संशोधन पद्धती', नित्य नूतन प्रकाशन, पुणे
५. मूल्यशिक्षण, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
६. जाधव रवी,गायकवाड, (२०१५), शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद




Scanned with CamScanner